पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
(पुर्वीचे सोलापूर विद्यापीठ) ( Formerly Solapur University)
NAAC Accredited-2015 'B' Grade (CGPA-2.62)
सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
✆: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३०० संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac, www.sus.ac.in
ईमेल - dbee@sus.ac.in ● परीक्षा व मूल्यमापन विभाग ● विस्तारीत क्रमांक - १३०

**जा.क्र.पुअहोसोविसो/परीक्षा व मूल्यमापन/२०१९/ 2857** **दिनांक : 16 /१२/२०१९.**

**प्रति,**
**मा.प्राचार्य,.**
प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ,
सोलापूर

**विषय:-** माहे ऑक्टोक्टर/नोव्हेंबर-२०१९ मध्ये झालेल्या सर्व परीक्षेतील परीक्षार्थींच्या उत्तरपत्रिकेचे मुल्यमापन On Screen Marking System प्रणालीव्दारे सत्वर पुर्ण करण्याबाबत

**महोदय,**

उपरोक्त विषयाच्या संदर्भात आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठामार्फत माहे ऑक्टोबर/नोव्हेंबर,२०१९ मध्ये घेण्यात आलेल्या सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षेमधील उत्तरपत्रिका On Screen Marking System प्रणालीव्दारे मूल्यमापन करण्यासाठी आपल्या महाविद्यालयातील शिक्षकांना ऑनलाईन प्रणालीव्दारे पाठविण्यात आल्या आहेत. परंतु ब-याच शिक्षकांनी अद्याप On Screen Marking System प्रणालीव्दारे उत्तरपत्रिकेच्या मुल्यमापनाचे काम पुर्ण केले नसल्याचे विद्यापीठाच्या निर्दशनास आले आहे. सदर बाब ही गंभीर स्वरुपाची असून प्रस्तुत विद्यापीठाने घेतलेल्या परीक्षेचे निकाल वेळेवर जाहीर करण्यास विलंब होत आहे.

२. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मध्ये परीक्षा झाल्यानंतर सर्व अभ्यासक्रमाचे निकाल वेळेवर घोषित करणेची निर्देश असून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम ४८ (४) नुसार संलग्नीत महाविद्यालयातील शिक्षकांना परीक्षेचे कामकाज वेळेत पूर्ण करणे बंधनकारक आहे. सदरील कामामध्ये कसूर केल्यास ते गैरवर्तणूक असल्याचे समजण्यात येईल आणि तो कर्मचारी शिस्तभंगविषयक कारवाईसाठी पात्र असेल, अशा स्वरुपाची तरतूद नमूद केली आहे.

सबब, वरील विद्यापीठ कायदयातील तरतूदी विचारात घेता परीक्षेचे कामकाज प्राधान्याने पुर्ण करणे बंधनकारक असल्यामुळे आपल्या महाविद्यालयातील ज्या ज्या शिक्षकांना On Screen Marking System प्रणालीव्दारे उत्तरपत्रिकेच्या मुल्यमापनाचे काम प्रस्तुत विद्यापीठाकडून देण्यात आले आहे, अशा सर्व शिक्षकांना उत्तरपत्रिकेच्या मुल्यमापनाचे काम सत्वर पुर्ण करण्याच्या सूचना आपल्या स्तरावरुन देऊन सर्व अभ्यासक्रमाचे निकाल विहित मुदतीमध्ये जाहीर करण्यासंदर्भात प्रस्तुत विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

**(सी ए श्रेणीक शाह)**
प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

सहपत्र : काही नाही.